# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0210 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/07/2026 23:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 30/06/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/07/2026
**Time From (वेळेपासून):** 16:16 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/07/2026 **Time (वेळ):** 22:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 043
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2026 22:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 04 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कोल्हापूर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैष्णवी सुरेश पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,शाहुवाडी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,शाहुवाडी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9764140777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजयकुमार विलास वनमोरे | | | 1. ओकोली रोड, शाहुवाडी, ताशाहुवाडी, जि कोल्हापूर, शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत<br>2. प्लट नंबर 205, संजय अपार्टमेन,कोयना वसाहत, कराड, ता कराड,जिसातारा, , कराड शहर,सातारा,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 01/07/2026

मी वैष्णवी सुरेश पाटील, वय 46 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 9764140777 समक्ष शाहुवाडी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनांक 25/06/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना, मला कृष्णा गणपती पाटील,वय 44 वर्षे, व्यवसाय - शेती व ठेकेदार, रा. विरळे, ता.शाहूवाडी, जि कोल्हापूर मो नं 9922739812 हे कार्यालयात येवुन भेटले त्यांनी त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन, तक्रारी अर्ज दिला. त्यातील मजकुर असा की, मी वरील प्रमाणे असुन दिसान ईन्फ्रा प्रा.लि.मलकापूर ही केतन पाटील यांचे मालकीची असुन त्याची कंपनी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत निघणारे रस्त्याची तसेच गटारी, पुलांची कामे टेंडर भरून घेत असते. वरील कंपणीने कामे घेतलेनंतर त्यांची काही कामे आम्ही सब ठेकेदार म्हणुन घेत असतो व पुर्ण करून देत असतो. तसेच अन्य ठेकेदार यांचेकडुन ही आम्ही सब ठेकेदार म्हणुन काम घेत असतो. त्यानंतर निघणारे बिल हे कंपणीच्या नावावर निघते त्यानंतर कंपणी मला मी केलेल्या कामाचे बिल अदा करत असते. काम झालेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बिलाचे अनुषंगाने मलाच पाठपुरावा करावा लागतो.

दिसान ईन्फ्रा प्रा.लि.मलकापूर या कंपणीने दिनांक 23/11/2023 रोजी प्रजिमा क्रमांक 3 ते सोनारवाडी, कर्नाळवाडी रस्ता ग्रा.मा.क्र.176 कि.मी.0/00 ते 3/00 ची सुधारणा करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर चे काम टेंडर भरून मिळविले होते. सदरचे काम 78 लाख 98 हजार 308 रूपये इतक्या रक्कमेचे काम असुन सदर कामाचे बिल जसे काम पुर्ण होईल तसे मिळत असते. काम दिसान ईन्फ्रा प्रा.लि.मलकापूर चे केतन पाटील यांनी मला करणेस सांगितले त्याप्रमाणे मी माझे साधनानी व वाहनानी कोतोली धनगरवाडा ते विरळे हददी पर्यंत 2 कि.मी.चा मुरमीकरण व खडीकरण चा रस्ता चे काम चालु केले आहे. आतापर्यंत मला सदर कामाचे 30 टक्के पर्यंत अंदाजे 14 लाख रूपये मिळालेले आहेत. तसेच हया कामाचे दिनांक 22/06/2026 रोजी 2,39,406/- रूपये जमा झालेले आहेत. सदर कामाचे बिल मला मिळालेनंतर माझे मित्राचे मोबाईलवरून मला सार्वजनिक बांधकाम विभाग, मलकापूर, ता.शाहुवाडी येथील उप अभियंता वनमोरे यांनी फोन करून जे बिल तुम्हाला मिळाले आहे आता जमा झालेल्या बिलाचे दोन टक्के म्हणजे 4,700/- रूपये पाठवा. तसेच यापुर्वी मी में. ऐ.जी.पाटील कंन्स्ट्रक्शन मलकापूर या मुख्य ठेकेदार कडुन यापुर्वी शिराळे वारूण पुलाचे काम सब ठेकेदार म्हणुन पुर्ण केले आहे. त्याकामाचे सुध्दा बिल मंजुर करून दिले आहे त्याचे सुध्दा 30,000/- रूपये दया असे मिळुन 34,700/- रूपये दया नाहीतर येथुन पुढे बिले काढताना आम्ही पण बघुन घेवु असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना चार पाच दिवसात पैशाची जुळणा झालेनंतर भेटतो असे सांगितले होते. मी दिनांक 30/06/2026 रोजी वनमोरे साहेब यांना भेटणेस जाणार असुन, त्यांचेवर आपणाकडुन कारवाई व्हावी म्हणुन अर्ज दिला. त्यावेळी त्यांनी आम्हाला दिनांक 30/06/2026 रोजी शिरगाव.ता. शाहुवाडी येथे येण्यास सांगितले. आम्ही त्यांना तेथे येत असल्याचे सांगुन तक्रारीबाबत गोपनीयता राखणेबाबत सुचना दिल्या. दिनांक 30/06/2026 रोजी त्यांनी सांगितले ठिकाणी येत असल्याचे त्यांना सांगितले. दिनांक 30/06/2026 रोजी मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच पाठविणेबाबत कळविले. त्याप्रमाणे शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंचासह शासकीय वाहनातुन कोल्हापूर येथुन 12.00 वाजता निघुन तक्रारदार यांचे संपर्कात राहुन त्यांनी सांगितले ठिकाणी शिरगाव येथे 13.55 वाजता पोहचलो. त्यावेळी तेथे तक्रारदार पाटील हजर होते. आम्ही तक्रारदार यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. पाटील यांनी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई येथुनच मोकळया जागेतुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार पाटील व पंच नं.01 दिग्वीजय निकाडे यांचेसह सर्वप्रथम सार्वजनिक बांधकाम विभाग, मलकापूर, ता.शाहुवाडी येथील उप अभियंता वनमोरे हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्या अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ड.ैज्म्त् कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार पाटील व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यावेळी माझे सुचनेवरून तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्रं.9922739812 वनमोरे यांचे मो.क्र.9657693434 वरती 14.53 वाजता फोन करून ते कोठे आहे याबाबत माहिती घेतली असता ते दिघी शिराळा, ता. शाहुवाडी येथे असल्याचे त्यांनी सांगितले. सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर वरती रेकॉर्ड केला. वनमोरे हे दिघे शिराळा येथे असल्याने तेथे जावुन पुढील कारवाई करण्याचे सर्वमते ठरले. त्यानंतर आम्ही सर्वजण दिघी शिराळा चे जवळ असले सोडोंली गावाजवळ एका रिकाम्या जागी थांबलो त्यावेळी मी सर्वांना येथुन पुढील कारवाई येथुन करणार असल्याचे सांगुन पुन्हा सुचना दिल्या. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.54 वाजता चालु करून, तो तक्रारदार पाटील यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार पाटील व पंच नं.1 निकाडे यांना तक्रारदार यांचे चारचाकी वाहन क्रमांक एम. एच. 46 बी.ई.1314 वरून उप अभियंता वनमोरे यांची भेट घेण्याकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 अश्विनी दांगट असे शासकीय वाहनात थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 निकाडे असे काहीवेळाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 16.16 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 निकाडे यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत उप अभियंता वनमोरे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच निकाडे यांनी ते तक्रारदार यांचेसोबत गाडीतुन जात असताना रोडचे कडेला मोपेडवर थांबलेल्या एका इसमाने हात करून आमची गाडी थांबविल्याने तक्रारदार पाटील यांनी गाडी रोडकडेला थांबविली. एक इसम आमचे गाडीजवळ आला तक्रारदार यांना कोल्हापूर ला जायचे कॅन्सल झाले का असे म्हणुन ते दोघे बोलु लागले. त्यावरून मला तो इसम म्हणजे वनमोरे आहेत हे समजुन आले. त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांनी केले कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार पाटील 'काय त्या शिराळे वारूनच्या ब्रिजचं, ब्रिजचं ठरलं किती आपल्याला तेव्हा अमाउंट' असे म्हणाले त्यावेळी उपअभियंता वनमोरे 'पहिलं ठरलेलं तुम्ही परत बदलला, त्यानंतर ठरलेल्यातलं , तुम्ही फिफ्टी राहिल्यालातलं 15 दिलायं' असे म्हणाले. त्यावेळी पाटील '15 नाही 25 तुम्हाला दिलं ते' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे '15 दिलाय, ते....ते.... 75 टोटल ....75 देणार म्हटला पहिल्याचा 25 दिला मग 50 राहिलेत ' असे म्हणाले. त्यावेळी पाटील 'हा ' म्हणाले. त्यावेळी वनमोरे '50 मधले परवा तुम्ही वरती साईट वर गेल्यावर 15 दिलाया ऑनलाईन' असे म्हणाले. त्यावेळी पाटील 'हा मग एकुण किती झाले' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'एकूण म्हणजे 25 ते .... एकूण म्हणजे 75 ते गेले तर 35 राहिलेत' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील 'हा' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे '35 राहिलेत ओ' असे म्हणाले. त्यावेळी पुन्हा तक्रारदार पाटील व वनमोरे यांच्यात त्यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी पाटील यांनी शिराळे वारूण चे कामाचे 35 देतो असे म्हणुन कर्नाळवाडी सोनारवाडी चे कामाचे 4 हजार हाईत त्यासाठी, थांबा माझे साठी मग असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे हे चालतय असे म्हणाले. त्यावेळी पाटील मग.. नक्की सांगा किती वाजता असे म्हणुन म्हणजे क्लिअर तुमच्या कडणं असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'ऑनलाईन ... ऑनलाईन करणार हाय का कस मला सांगा' असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार 'कॅश देवून टाकणार हाय तुमच्याकड' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'बर चालतयं ठिक हाय..' असे म्हणाले.त्यानंतर त्यांचेत उदया साडेबाराच्या पुढे पैसे घेवुन येणेबाबत चर्चा झाल्यानंतर, आम्ही परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 निकाडे यांनी सांगितलेप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार पाटील, वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार

पाटील यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार पाटील व वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांनी शिराळे वारूनच्या ब्रिजचे व कर्नाळवाडी ते सोनारवाडी गावातील रस्त्याचे कामाचे अनुषंगाने चर्चा होवुन शिराळे वारूनच्या ब्रिजचे कामाचे बिल मंजुर करणेकरीता तक्रारदार यांचेकडे 35 राहीले असे म्हणुन लाच मागणी केल्याचे तसेच कर्नाळवाडी ते सोनारवाडी रस्त्याचे कामाचे 4 हजार नंतर देण्याविषयी बोलने झाल्याचे व पैसे उदया घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. परंतु तक्रारदार पाटील व वनमोरे यांचेतील संभाषणामध्ये लाचेची मागणी अधिक स्पष्ट होणेकरीता उदया पुन्हा तक्रारदार पाटील यांना वनमोरे यांच्याकडे पाठवुन लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे सर्वमिते ठरले. त्यानंतर चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 01/07/2026 रोजी 13.30 वाजता आम्ही, दोन्ही पंच सापळा पथक असे मोळावडे, ता. शाहुवाडी येथे तक्रारदार यांनी सांगितले ठिकाणी पोहचलो. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना पुन्हा वनमोरे मागत असले लाचेच्या अनुषंगाने स्पष्ट पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर 13.47 वाजता चालु करून, तो तक्रारदार पाटील यांचे गळयात अडकवुन, तक्रारदार पाटील व पंच नं.1 निकाडे यांना तक्रारदार यांचे वरील क्रमांकाचे चारचाकी वाहनातुन उप अभियंता वनमोरे यांची भेट घेण्याकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 दांगट असे शासकीय वाहनात थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 निकाडे असे काहीवेळाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 14.08 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 निकाडे यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत उप अभियंता वनमोरे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले. ते व तक्रारदार असे सार्वजनिक बांधकाम विभाग, शाहुवाडी येथे गेले. त्यावेळी तक्रारदार व वनमोरे यांची भेट होवुन त्यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार पाटील 'ऐका की, दोन मिनीटं ऐका की, आपल्या शिराळया पुलाचं पण आणि आपल्या सोनारवाडी कर्नाळवाडी पण' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे हु..हु.. असे म्हणाले. त्यावेळी पाटील ऐका की ऐका.. असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे बोला की बोला असे म्हणाले. त्यावेळी पाटील 'ते 35 हजार आणि हे 40 हजार,सॉरी 4700' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे हुं.. असे म्हणाले. त्यावेळी पाटील 'असे काय होईल, ते मग त्यात काय एक दोन हजार हे करून, करून टाकूया आज' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'त्यात कमी करून' असे म्हणुन त्यांचे साहेबांना सोडुन परत येतो असे म्हणाले. त्यावेळी पाटील 'पैसे आज देणार आहेत' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'असू दे त्यांचा काय विषय नाय, असू दे दया की' असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत वनमोरे हे साहेबांना घेवुन येणार आहेत. तसेच ते तासाभरात ऑफीसमध्ये येणार आहेत या अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी पाटील 'करून आणतो मी, हे 35 हजार आणि त्यात किती 3 हजार टाकलं तर चालतील काय?' असे विचारले त्यावेळी वनमोरे ' ठिक हाय ते काय टाकायचं ते, तुमच्या हेणं टाका' असे म्हणाले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 निकाडे यांनी सांगितलेप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार पाटील, वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार पाटील यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार पाटील व वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांनी शिराळे वारूनच्या ब्रिजचे काम कर्नाळवाडी ते सोनारवाडी गावातील रस्त्याचे कामाचे अनुषंगाने चर्चा होवुन वनमोरे यांनी दोन्ही कामाचे मिळुन तक्रारदार यांच्याकडे 38,000/- रूपयांची मागणी करून ते तासाभरात घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही वनमोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार पाटील यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांच्याकडे आता 15,000/- रूपये असल्याचे सांगुन त्यांचेकडील 500/- दराच्या 30 चलनी नोटा असे 15,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. परंतु वनमोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे 38,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे त्यामुळे मी 500/- रू असे लिहलेल्या चिल्डर्स बॅंक च्या लहान मुलाच्या खेळण्यातील 46 नोटा उपलब्ध केल्या. त्यामुळे एकुण 38,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध झाली. त्यानंतर मी तक्रारदार व पंचाना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळयाचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, व तक्रारदार पाटील, दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरून तक्रारदार पाटील यांनी वनमोरे यांना 16.19 वा फोन केला असता वनमोरे यांनी ते ऑफीसमध्ये आहे असे सांगितले. त्यानंतर अॅंथ्रासिन लावलेले 38,000/- रूपये एका कागदामध्ये गुंडाळुन तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे पुढील

खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार पाटील , दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार पाटील यांना वनमोरे उप अभियंता यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचा हातरूमाल तोडांवरून फिरवण्याचा आहे हा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.22 वाजता सुरू करून, तो तक्रारदार पाटील यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार पाटील व पंच नं.1 निकाडे असे त्यांचे चारचाकी वाहनाने वनमोरे यांची भेट घेण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, शाहुवाडी कार्यालयात पाठविले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 अश्विनी दांगट असे आमचेकडील शासकीय चारचाकी वाहनातुन त्यांचे पाठोपाठ मलकापूर एस.टी. स्टॅण्ड चे पाठीमागे असले सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयाजवळ आलो. तेथे आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी तक्रारदार पंच निकाडे असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयात गेले. त्यानंतर लगेचच तक्रारदार, पंच निकाडे व त्यांचेबरोबर वनमोरे हे कार्यालयाचे बाहेर येवुन कार्यालयाचे थोडे बाजुला गेले. त्यानंतर वनमोरे हे त्यांचे कार्यालयात आतमध्ये गेले. त्यानंतर तक्रारदार पाटील यांनी वनमोरे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 दांगट व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार पाटील यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 16.37 वाजता बंद केला. त्यानंतर आम्ही कार्यालयात जावुन तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह वनमोरे यांना पकडले. त्यांना त्यांचे नाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विजयकुमार विलास वनमोरे, वय - 50 वर्षे, पद - शाखा अभियंता, वर्ग - 2, नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी असे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पंचाचे समक्ष वनमोरे यांनी लाच स्विकारून ती एका प्लॅस्टीक पिशवीमध्ये ठेवली होती ती लाच रक्कम प्लॅस्टीकचे पिशवी सह हस्तगत केली. त्यावेळी वनमोरे यांचे दोन्ही हाताचे बोटाना, तळ हातास तसेच लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे पुढील बाजुचे डाव्या बाजुचे खिशात ठेवली होती त्या खिशात व खिशांचे कडास अंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर सापळा ठिकाणचे व्हिडीओ शुटींग सापळा पथकातील अमंलदार उदय पाटील यांनी केलेले आहे. सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे पंच नं.01 निकाडे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार वनमोरे यांचे कार्यालयात गेले. त्यावेळी तक्रारदार व वनमोरे त्यांचेत चहा व तहसील कार्यालयातील एका कर्मचारी यांचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी पाटील यांनी 'हे इथंच हे करूया का?' असे विचारले, त्यावेळी वनमोरे ते नाय, इथं कॅमेरे हाईत सगळी कडे ऑफिसला.. असे म्हणाले. त्यानंतर कामाचे अनुषंगाने बोलत ते कार्यालयाचे बाहेर आले. त्यावेळी तक्रारदार 'आणि ते 3 हजार ...,38 हजार रूपये' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे बर असे म्हणाले. त्यावेळी पाटील मोजुन घ्या असे म्हणुन लाच रक्कम वनमोरे यांच्याकडे दिली. त्यावेळी वनमोरे यांनी ती लाच रक्कम दोन्ही हातानी स्विकारून एका प्लॅस्टीकचे पिशवी मध्ये ठेवली व नाही,मोजायची काय गरज नाय असू दे, तुम्ही केलयं म्हटल्यावर.. असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार 'मोजून घ्या, नाय डोक्याला ताप नको' असे म्हणाले. त्यावेळी वनमोरे 'नाय असू दे..' असे म्हणाले. त्यानंतर वनमोरे यांनी माझेकडे (पंचाकडे) बघुन 'ओ दादा इकडं या जरा तुम्ही फोटो बिटो काढला काय' असे विचारले, त्यावेळी मी नाही म्हणुन सांगितले.त्यानंतर ते लाच रक्कम घेवुन कार्यालयात गेले. त्यानंतर तक्रारदार पाटील यांनी वनमोरे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता, त्यांनीही पंच निकाडे यांचे हकीकतशी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही शाहुवाडी पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार कृष्णा गणपती पाटील हे सार्वजनिक बांधकाम विभाग, शाहुवाडी मार्फत निघणारे रस्त्याचे, गटारी व पुलांची कामे मुख्य ठेकेदार यांच्याकडुन उप ठेकेदार म्हणुन घेवुन पुर्ण करून देत असतात. त्यांनी शिराळे वारूनच्या ब्रिजचे काम व कर्नाळवाडी (धनगरवाडा) ते सोनारवाडी (विरळे) गावातील रस्त्याचे काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी येथील शाखा अभियंता विजयकुमार वनमोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे कर्नाळवाडी (धनगरवाडा) ते सोनारवाडी (विरळे)हददीपर्यंतचे दोन किलोमिटर रस्त्याचे मुरमीकरण व खडीकरण व शिराळे वारून पुलाचे कामाचे बिल मंजुर केले म्हणुन दोन्ही कामाचे मिळुन तक्रारदार यांच्याकडे स्वता:करीता बेकायदेशीरपणे 38,000/- रूपये लाचेची मागणी करून, 38,000/- लाच रक्कम अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने त्यांना पकडले आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक विजयकुमार विलास वनमोरे, वय - 50 वर्षे, पद - शाखा अभियंता, वर्ग - 2, नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभाग शाहुवाडी,(मलकापूर) जि.कोल्हापूर मुळ रा. प्लॅट नंबर 205, संजय अपार्टमेन्ट , कोयना वसाहत, कराड, ता. कराड, जि.सातारा, सद्या रा. ओकोली रोड, शाहुवाडी, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता

बरोबर आहे.

समक्ष

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

rajendra sadashiv sawantre(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** rajendra sadashiv sa

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**